



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २४८, बुधवार १९ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# विखेंचे नव्हे, थोरातांचे सुदर्शनचक्र फिरले, पुढेही फिरणार!

## ■ खा.नीलेश लंके यांचे प्रतिपादन ■ लंके यांनी थोरातांची भेट घेत व्यक्त केली कृतज्ञता

संगमनेर : गोरक्ष नेहे

**जिल्हयाच्या राजकारणात आतापर्यत विखे परिवाराने सुदर्शन चक्र फिरविले की भले भले पराभूत होत. यंदाच्या जिल्हयातील लोकसभेच्या ऐतिहासिक निवडणूकांमध्ये पालकमंत्री राधाकृष्ण विखे नव्हे तर मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांचे सुदर्शनचक्र फिरले असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.**

खासदार नीलेश लंके यांनी मंगळवारी मा. मंत्री बाळासाहेब विखे यांची भेट घेत त्यांनी लोकसभा निवडणूकीत दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.
लंके म्हणाले, जिल्हयाच्या राजकारणात स्व. बाळासाहेब विखे यांचे सुदर्शनचक्र फिरले की भले भले उमेदवार पराभूत होत. त्यांची त्या काळात जिल्हा विकास आघाडी असे. यंदाच्या लोकसभा निवडणूकीत मात्र नगर व शिर्डी लोकसभा मतदारसंघात विखे यांची विकास आघाडी मात्र दिसूनच आली नाही. कारण ज्या कारणासाठी विकास आघाडी निर्माण केली ते सगळेच विखे यांच्या कळपात होते. समोरच्या उमेदवाराच्या विरोधात असलेल्यांना एकत्र करून मातब्बराला पराभूत करणे हा डाव त्यामुळे असफल झाल्याचे लंके यांनी सांगत यापुढील काळात मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याच हातात नगर जिल्हयाची सुत्रे राहतील, ते कधीही सुडाचे राजकारण करणार नाही. थोरात कुटूंबाचा तो वारसा आहे. माझ्या विजयामध्ये मा. मंत्री थोरात यांचा सिंहाचा वाटा असल्याचे लंके यांची स्पष्ट केले.

यांप्रसंगी मा.आ.डॉ.सुधीर तांबे, सौ.दुर्गाताई तांबे, कारखान्याचे चेअरमन बाबासाहेब ओहोळ, सौ.प्रभावतीताई घोगरे, युवक काँग्रेस अध्यक्ष कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात, अरूण पा.कडू, शंकरराव पा. खेमनर, तालुकाध्यक्ष मिलिंद कानवडे, सोमेश्वर दिवटे, अमर कतारी, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर आदींसह काँग्रेस पक्षाचे व अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलताना खासदार लंके म्हणाले की, महाभारतात कौरव आणि पांडवांच्या युद्धात श्रीकृष्णाने अत्यंत मोलाची भूमिका बजावली तशीच भूमिका आमदार बाळासाहेब थोरात यांनी आपल्या विजयात बजावली आहे. माझ्या विजयाचे खरे किंगमेकर आमदार थोरात हे आहेत. मी अत्यंत सामान्य कार्यकर्ता आहे.परंतु संघर्षातून पुढे आलो आहे.ज्येष्ठ नेते खा.शरदचंद्रजी पवार साहेब, आमदार बाळासाहेब थोरात यांचा विश्वास आणि जनतेची साथ यामुळे बलाढ्य शक्तीचा पराभव करण्यात यश मिळाले आहे. निवडणुकीमध्ये त्यांनी अनेक प्रकार केले. धमक्या दिल्या, गुन्हे दाखल केले, नागरिकांच्या बोटाला बाहेर शाई लावण्याचा प्रयत्न केला .परंतु असे करूनही जनतेने त्यांना साफ नाकारले.
आमदार बाळासाहेब थोरात यांची यंत्रणा अत्यंत निष्ठावंत आणि प्रामाणिक असून त्यांच्या मोलाच्या मदतीने हा विजय साकारला आहे. आगामी काळामध्ये जिल्ह्यात सर्वांना बरोबर घेऊन आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभेत महाविकास आघाडीच्या विजयासाठी सर्वांनी काम करायचे आहे.

आमदार थोरात म्हणाले की, नगर दक्षिणची लढाई ही श्रीमंत विरुद्ध गरीबाची होती. नीलेश लंके सामान्य परिवारातील असून संघर्षातून पुढे आले आहे. कोरोना काळात त्यांनी उल्लेखनीय काम केले असून त्यांची लोकप्रियता मोठी होती. त्यांच्या लोकप्रियतेची धास्ती घेऊन विद्यमान सत्ताधाऱ्यांनी दडपशाहीचा वापर सुरू केला. जिल्ह्यात त्यांनी सत्तेचा गैरवापर करून संगमनेर पारनेरसह सर्वत्र दहशत निर्माण केली आहे. सत्तेचा वापर हा सामान्यांच्या विकासाऐवजी ते जिरवा जिरवीचे राजकारण करून दडपशाही निर्माण करत आहे.

संपत्ती, सत्ता, असतानाही आघोरी दहशत वापरामुळे जनतेने त्यांना नाकारले आहे. या उलट जीवाला जीव देणारी माणसे लंके आणि निर्माण केली आहे. लंके हे अभ्यास असून त्यांचा भविष्यकाळ उज्वल आहे. दिल्लीतही त्यांनी आपले कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटवावा असा आशावाद व्यक्त करताना जिल्ह्यामध्ये समविचारी लोकांना एकत्र घेऊन येणारी विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्था लढवू असेही ते म्हणाले.

मा.आ.डॉ.तांबे म्हणाले की, देशात महागाई बेरोजगारी व अस्थिरता वाढली असून एकाधिकारशाही निर्माण करू पाहणाऱ्या भाजपाला महाराष्ट्राने रोखले आहे. आमदार बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली उत्तर महाराष्ट्रात आठ पैकी सहा व अहमदनगर मध्ये दोन्ही जागा जनतेने मोठ्या मताधिक्याने महाविकास आघाडीला दिल्या असल्याचे ते म्हणाले.यावेळी तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### आधी फेटा थोरात साहेबांना

**नगर दक्षिणची निवडणुकी अत्यंत अटीतटीची व संघर्षाची होती. या निवडणुकीत आमदार थोरात हे भक्कम पाठीशी उभे राहिले. त्यांनी विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले असल्याने त्यांनी फेटा बांधल्याशिवाय आपण फेटा बांधणार नाही. हा पण मी केला होता. विजय झाल्यानंतर मी कुठेही फेटा बांधला नाही. थोरात साहेबांनी फेटा बांधावा तरच मी फेटा बांधील असा आग्रह केल्यानंतर आमदार थोरात यांनी सर्वांच्या आग्रहास्तव फेटा बांधला व त्यानंतरच खा. नीलेश लंके यांनी फेटा बांधला. यावेळी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.**

### साहेबांच्या कष्टाचे चीज झाले

**पक्ष फुटला, चिन्ह गेल्यानंतर वयाच्या ८४ व्या वर्षी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पायाला भिंगरी लावून मविआचा प्रचार केला. राज्यात महाविकास आघाडीला ३१ जागा मिळाल्या असून नगर दक्षिणची जागा मोठ्या फरकाने जिंकल्याने खासदार पवार साहेब यांच्या कष्टाचे चीज झाले असल्याचे आमदार थोरात म्हणाले.**

### आमदार थोरात यांची निष्ठावंत यंत्रणा

**राज्यातील अभ्यासू, शांत ,संयमी आणि सर्वांना बरोबर घेऊन जाणारे नेते म्हणून आमदार बाळासाहेब थोरात यांची ओळख आहे. तालुक्यातील प्रत्येक माणसाला जपताना या नेतृत्वाने जीवाभावाची माणसे निर्माण केली आहे. लई यंत्रणा असतील परंतु निष्ठावंत आणि प्रामाणिक यंत्रणा म्हणून आमदार बाळासाहेब थोरात यांच्या यंत्रणेचा राज्यात नक्कीच गौरव आहे अशा शब्दात खासदार नीलेश लंके यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.**

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका होणे गरजेचे

## पद्मश्री पोपटराव पवार यांचे मत

वर्धा : प्रतिनिधी

**लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती या विकासाच्या रक्तवाहिन्या असून ग्रामिण भागाच्या विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका होणे गरजेचे असल्याचे मत पद्मश्री पोपटराव पवार यांनी सांगितले.**

वर्धा येथे सामाजिक कार्यक्रमासाठी पद्मश्री पोपटराव पवार हे गेले असता माध्यम प्रतिनिधींशी बोलताना त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका तातडीने होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.




पवार म्हणाले, लोकशाहीची जी निवडणूक प्रक्रिया आहे, लोकसभा, विधानसभा, जिल्हापरीषद, पंचायत समिती या विकासाच्या रक्तवाहिन्या आहेत. दिल्लीपासून गावापर्यंत एकच मागणी आहे की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका झाल्या तर कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण होते. या घटकांच्या माध्यमातून विविध योजना सामान्य मानसांपर्यंत घेऊन जाण्यात आपण यशस्वी होऊ शकतो. त्यामुळे निश्चितपणे या निवडणूका होणे गरजेचे असल्याचे पवार म्हणाले.

पवार पुढे म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी असतील तर विकास कामे होतील. स्थानिक स्वराज्य संस्था या विकासाच्या वाहिन्या आहेत. त्यामुळे विकासाला बळ येईल. त्यासाठी विधानसभेच्या अगोदर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका झाल्या पाहिजेत. शेवटच्या घटकांपर्यत जाण्याची प्रक्रिया आज प्रशासकीय स्तरावर आहे. प्रशासक कुठे चुकत असेल तर त्यास लोकप्रतिनिधी विरोध उर्वरीत पान ३ वर

# जुन्या पेन्शन योजनेचा तिढा मीच सोडविणार!

## ■ अपक्ष उमेदवार विवेक कोल्हे यांचा निर्धार ■ तर पुन्हा मते मागण्यासाठीही येणार नाही ■ कोल्हे यांची परखड भूमिका

नाशिक : प्रतिनिधी

**गेल्या अनेक दिवसांपासून जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न शासन दरबारी प्रलंबित असून शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींकडून त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. मला संधी दिली तर जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न मीच मार्गी लावणार असा निर्धार व्यक्त करत हा प्रश्न माझ्याकडून सुटला नाही तर पुन्हा मते मागण्यासाठी येणार नाही अशी परखड भूमिका नाशिक शिक्षक मतदारसंघातील अपक्ष उमेदवार विवेक कोल्हे यांनी मांडली.**

कोल्हे म्हणाले, नाशिक शिक्षक मतदार संघातून शिक्षक तसेच कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर आपण निवडणूकीच्या रिंगणात उतरलो आहोत. आपण विवेकनामा प्रसिध्द केला असून तो सर्वसमावेशक असा असल्याच्या प्रतिक्रीया सर्वसामान्य शिक्षक मतदार देत आहेत. शिक्षकांच्या ज्या काही प्रलंबित मागण्या आहेत, त्यांचा विचार करून त्यांची पुर्तता कशी करता येईल याचे धोरणात्मक आश्वासनही आपण दिल्याचे विवेक कोल्हे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून शासन दरबारी जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न प्रलंबित आहे. या प्रश्नाकडे संबंधितांनी लक्ष न दिल्याने त्याविषयी या निवडणूकीच्या दरम्यान सार्वत्रीक चर्चा होताना दिसत आहे. जुन्या पेन्शन योजनेचा विषय हा नव्याने दाखल झालेल्या शिक्षकांसाठी महत्वपूर्ण आहे. त्यामुळे हा प्रश्न मार्गीच लागला पाहिजे ही भूमिका घेत विवेक कोल्हे या निवडणूकीच्या रिंगणात उतरले असुन हा प्रश्न मीच मार्गी लावणार, अन्यथा पुन्हा मते मागण्यासाठी येणार नाही अशी भीष्मप्रतिज्ञा त्यांनी केली आहे. राज्यात,



केंद्रात कोणाचेही सरकार असो मी अपक्ष म्हणून उमेदवारी करत असल्याने कोणत्याही पक्षाविरोधात या निर्णयासाठी मी ठामपणे लढा देईल अशी ग्वाही कोल्हे यांनी विवेकनाम्यात दिली आहे.

**देशाचा विकास, जडणघडणीत शिक्षकांचे योगदान**

सन २००५ नंतर शिक्षक म्हणून रूजू झालेल्या शिक्षकांसाठी पेन्शन योजना लागू नाही. खरे तर शिक्षक हे समाज निर्मितीचे महत्वाचे काम करतात. त्यांच्या प्रती शासनाने असा संकुचित दृष्टिकोन ठेवणे चुकीचे आहे. देशाच्या विकासात आणि जडणघडणीत सर्वाधिक योगदान शिक्षण क्षेत्र देत असताना असा अन्यायकारक निर्णय लादला गेल्याने नव्या शिक्षकांमध्ये मोठा रोष आहे. त्याविरोधात लढा सुरू असला तरी ठोस निर्णय मात्र होऊ शकला नाही. त्यामुळेच या निवडणूकीत यश उर्वरीत पान ३ वर

# खासदार सुनील तटकरे यांचा आजपासून राज्यव्यापी दौरा !

## रांजणगावच्या महागणपतीचे दर्शन घेऊन दौऱ्याला सुरुवात



शिरुर : प्रतिनिधी

**एकच लक्ष्य विधानसभा क्षेत्र हे ब्रीदवाक्य घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आज रांजणगावच्या महागणपतीचे दर्शन घेऊन राज्यव्यापी दौऱ्याला सुरुवात केली. यावेळी त्यांच्यासमवेत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर उपस्थित होत्या. अहमदनगर जिल्हयातून आज दुपारपासून त्यांचा दौरा** उर्वरीत पान ३ वर









# प्रगतीमंत्र

जगात सर्वत्र आर्थिक घडामोडी मोठ्या प्रमाणावर घडत असतात किंबहुना बहुतेक घडामोडींचे केंद्र हे अर्थकारणच असते. त्यामुळे वाणिज्य क्षेत्राची निवड ही या क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. वाणिज्य शाखेत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना व्यापार, व्यवसाय, बाजारातील चढउतार, अर्थशास्त्राची मूलभूत तत्त्वे, सरकारची वित्तीय धोरणे, औद्योगिक धोरण, शेअर मार्केट आदी बाबींचे ज्ञान प्राप्त होते. बारावीनंतर इच्छुक उमेदवार बी.कॉम आणि त्यानंतर एम.कॉम करू शकतो. या दरम्यान संबंधित विद्यार्थ्यांचा वित्त, व्यवसाय प्रशासन, लेखा, ई-कॉमर्स, विक्री, विपणन आदी विषयांचा अभ्यास होतो.

## व्हा भूलतज्ज्ञ!

**ॲनेस्थेसियोलॉजी हा औषधाचा अभ्यास करणाऱ्या लोकांसाठी करिअरचा एक चांगला पर्याय आहे. वैद्यकीय क्षेत्रातील हे एक प्रतिष्ठित आणि किफायतशीर क्षेत्र आहे ज्यासाठी विशेष प्रशिक्षण आवश्यक आहे. शस्त्रक्रियेच्या प्रक्रियेत 'भूलतज्ज्ञ' खूप महत्त्वाची भूमिका बजावत असून, ते रुग्णांच्या शस्त्रक्रियेदरम्यान त्यांच्या महत्त्वाच्या लक्षणांचे निरीक्षण करतात. वास्तविक, 'भूलतज्ज्ञ' हा एक डॉक्टर असतो जो शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाला द्यावयाच्या औषधांचा आणि औषधांचा डोस ठरवतो. जर तुम्हाला वैद्यकशास्त्रात रस असेल, तर तुम्ही या क्षेत्रात करिअर करून चांगली कमाई करू शकता. 'ॲनेस्थेसियोलॉजिस्ट' किंवा 'ॲनेस्थेटिस्ट' कसे बनायचे ? त्यासाठी कोणता कोर्स करायचा ? या क्षेत्रात करिअरला किती वाव आहे ? हे व्यावसायिक किती कमावतात ? याबद्दल जाणून घेऊया...**



### ✓ 'ॲनेस्थेसियोलॉजिस्ट' कामाचे स्वरुप

कोणत्याही शस्त्रक्रियेपूर्वी भूलतज्ज्ञाचा सल्ला आवश्यक असतो. रुग्णाच्या आरोग्याच्या मूल्यांकनावर आधारित तो भूल आणि औषधांचा डोस ठरवतो. शस्त्रक्रियेदरम्यान ते खात्री करतात की रुग्ण वेदना किंवा अस्वस्थता अनुभवत नाही. वेगवेगळ्या शस्त्रक्रियेदरम्यान, रुग्णाच्या वेदना कमी करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जातो. ते रुग्णाच्या हृदयाचे ठोके, शरीराचे तापमान, ऑक्सिजन पातळी, रक्तदाब इत्यादींवर लक्ष ठेवतात. हे शस्त्रक्रियेनंतरही रुग्णाची स्थिती सामान्य करण्यास मदत करतात.

### ✓ नोकरी अन् करिअर संधी

भूलतज्ज्ञ करिअरमध्ये संधींची कमतरता नाही. ते कोणत्याही वैद्यकीय विद्यापीठ, संस्था, सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रातील रुग्णालयात त्यांची सेवा देऊ शकतात. ॲनेस्थेसियोलॉजी कोर्सेस अनेक संस्था, विद्यापीठे ॲनेस्थेसियासाठी अभ्यासक्रम ऑफर करतात. ज्यामुळे विद्यार्थ्यांना ॲनेस्थेसियोलॉजिस्ट आणि ॲनेस्थेसियोलॉजिस्टचा व्यवसाय करण्याची संधी मिळते. या क्षेत्रात पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. भूलतज्ज्ञ होण्यासाठी वैद्यकशास्त्रातील सर्व विशेष विषयांवर चांगली पकड आणि व्यावहारिक ज्ञान असणे आवश्यक आहे. एमबीबीएस पदवीसाठी बारावीनंतर NEET परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. एमबीबीएस केल्यानंतरच तुम्ही भूलतज्ज्ञ म्हणून करिअर करू शकता.

### ✓ भूलतज्ज्ञचा पगार किती ?

या क्षेत्रातील भूलतज्ज्ञ उमेदवारांना आकर्षक पगार मिळतो. तथापि, इतर कोणत्याही क्षेत्राप्रमाणे, येथे पगार देखील उमेदवाराच्या अनुभवावर, नोकरीचे स्थान आणि नोकरी प्रोफाइलवर अवलंबून असतो. भारतातील ॲनेस्थेसियोलॉजिस्टचे सरासरी वेतन पॅकेज सुमारे १२ लाख रुपये आहे. करिअरच्या सुरुवातीला ३० ते ५० हजार रुपये दरमहा उपलब्ध असतात. तासाभराचे काम करणारे अनुभवी ॲनेस्थेसियोलॉजिस्ट बरेच पैसे मिळवू शकतात.

## इंटर्नशिपदरम्यान 'या' टिप्स करा फॉलो

- गंभीर व्हा : इंटर्नशिप दरम्यान सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कामाच्या बाबतीत गंभीर असणे. प्रत्येक गोष्टीला गांभीर्याने घ्या. इंटर्नशिप ही व्यावसायिक जीवनाची पहिली पायरी आहे. जर तुम्ही कामाबद्दल गांभीर्य दाखवले आणि सतर्कता बाळगली तर ही गोष्ट तुमच्या वरिष्ठांच्या निदर्शनास नक्कीच येईल. ज्यामुळे तुम्हाला येणाऱ्या भविष्यात आणखी चांगल्या संधी मिळू शकतात.
- वर्क कल्चर समजून घ्या : या काळात आपल्याला वर्क कल्चर समजते. कंपनीच्या कामाशी जुळवून कसे काम करावे ? कंपनीचे जॉब मार्केट काय आहे ? तुम्हाला कोणते प्रोजेक्ट हवे आहेत ? त्यावर कसे काम करावे लागेल ? एका ठराविक मुदतीत संपूर्ण काम कसे पूर्ण करायचे हे समजून घ्या. व्यावसायिक जीवनातील प्रत्येक लहान- मोठ्या गोष्टी या इंटर्नशिप दरम्यान शिकवल्या जातात. त्यामुळे हा टप्पा प्रत्येक उमेदवारासाठी खूप महत्त्वाचा असतो.
- गोष्टी शिकण्यात स्वारस्य दाखवा : हा असा टप्पा आहे जिथे तुम्ही सर्वात जास्त शिकू शकता. त्यामुळे तुमच्याकडे काम नसले तरीही तुमच्या वरिष्ठांशी स्वतः बोलण्याचा प्रयत्न करा. त्यांना कळू द्या की तुम्हाला प्रोजेक्ट्सवरही काम करायचे आहे. तुमची आवड दाखवा. ज्यामुळे त्यांना कळेल की तुम्हाला नवीन गोष्टी शिकण्यात रस आहे. यामुळे तुम्ही कामाला घाबरत नाही, तर समोरून स्वतःहून काम करा.
- डेडलाइन पाळा : व्यावसायिक जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डेडलाइन, कारण ठरलेल्या डेडलाइनमध्ये काम पूर्ण झाले नाही तर काही उपयोग होणार नाही. त्यामुळे काम वेळेत पूर्ण करून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. असे करण्यात अयशस्वी झाल्यास तुमच्या बॉस आणि वरिष्ठांवर चांगली छाप पडणार नाही. त्यामुळे या गोष्टीची विशेष काळजी घ्या.



## कॉमर्समधून बारावी झालीये ?

**बारावीचा निकाल लागल्यानंतर पालकांची व मुलांची चिंता वाढू लागली. बारावी तर झाली पण पुढे काय हा प्रश्न सतत त्यांना सतावत असतो. त्यात जर कॉमर्स सारखा विषय असेल तर आणखीनच प्रश्न पडू लागतात. पण जर तुम्ही कॉमर्स क्षेत्रात तुमचे करिअर करण्याचा विचार करत असाल तर तुम्हाला अकाऊंट्स, फायनान्स, बिझनेस स्टडीज हे विषय चांगले पर्याय आहेत. परंतु करिअरचे सर्व पर्याय आणि ग्रॅज्युएशनसाठी पुढे कोणते पर्याय चांगले आहेत हे समजून घेऊया...**

- बॅचलर ऑफ कॉमर्स (B.Com) : अनेकदा कॉमर्समधून 12 वी केल्यानंतर, विद्यार्थी B.Com निवडतात, ज्यामध्ये तुम्हाला 3 वर्षांचे ग्रॅज्युएशन करता. यामध्ये अकाउंट्स, स्टॅटिस्टिक्स, मॅनेजमेंट आणि ह्युमन रिसोर्स हे विषय शिकवले जातात. जर तुम्हाला अर्थशास्त्र आवडत असेल आणि तुम्हाला अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात करिअर करायचे असेल तर हा सर्वोत्तम पर्याय आहे.
- बॅचलर ऑफ लेजिस्लेटिव्ह लॉ (LLB) : जर तुम्ही कॉमर्समधून 12 वी केली असेल, तर LLB करणे हा एक चांगला पर्याय असू शकतो. यामध्ये बार कौन्सिल ऑफ इंडिया मधून पदवी मिळवल्यानंतर तुम्ही वकील बनू शकता. तुम्हाला कौटुंबिक वकील, मालमत्ता वकील किंवा कंपनीचे वकील बनायचे आहे की नाही हे तुमच्या विषयांवर अवलंबून असेल. केवळ वाणिज्य पार्श्वभूमीच नाही तर कला लोक देखील याचा पर्याय निवडू शकतात.
- चार्टर्ड अकाउंटंट (CA) : सीए म्हणजेच चार्टर्ड अकाउंटंट हा व्यावसायिक अभ्यासक्रम मानला जातो, ज्यामध्ये फक्त कॉमर्सचे विद्यार्थी जाऊ शकतात. या कोर्समध्ये प्रवेश घेण्यासाठी तुम्हाला खूप स्पर्धा करावी लागेल आणि अनेक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर याचे शिक्षण सुरू होते. चार्टर्ड अकाउंटंट हे कोणत्याही बॅचलर डिग्रीच्या तुलनेत खूपच अवघड आहे.
- बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (BBA) : जर तुमचे करिअरचे ध्येय बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये जाण्याचे असेल तर बीबीए करणे तुमच्यासाठी अधिक चांगले होईल. हे तीन वर्षांचे ग्रॅज्युएशन आहे, ज्याला कॉमर्सच्या अनेक विद्यार्थ्यांनी पसंती दिली आहे. यामध्ये तुम्हाला व्यवसायाशी संबंधित सर्व अभ्यास शिकवले जातात आणि तुम्हाला कॉर्पोरेट ऑपरेशनशी संबंधित सर्व गोष्टी अगदी सुरुवातीपासून शिकायला मिळतात.
- कंपनी सेक्रेटरी (CS) : CS कोर्स देखील प्रशासनाच्या अंतर्गत येतो, जो इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (ICSI) द्वारे आयोजित केला जातो. अनेक वाणिज्य पार्श्वभूमीचे विद्यार्थी हे निवडण्यास प्राधान्य देतात; परंतु त्यात सीए सारखी कठीण प्रवेश परीक्षा देखील असते.
- बॅचलर ऑफ इकॉनॉमिक्स : बॅचलर ऑफ इकॉनॉमिक्स ही 3 वर्षांची पदवी आहे, ज्यामध्ये तुम्ही अर्थशास्त्र वित्त आणि विश्लेषणात्मक पद्धतींचा अभ्यास करता. अर्थशास्त्रात आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी बॅचलर ऑफ इकॉनॉमिक्स करावे. इतकेच नाही तर यामध्ये तुम्ही सूक्ष्म- अर्थशास्त्र आणि मॅक्रो- इकॉनॉमिक्सचा सखोल अभ्यास करून वित्त क्षेत्रात जाता येते.
- जर्नलिझम आणि मास कम्युनिकेशन : जर तुम्हाला मीडिया किंवा जनसंपर्क क्षेत्रात जायचे असेल तर तुमच्यासाठी पत्रकारिता आणि जनसंवाद हा एक चांगला पर्याय असेल. यामध्ये फायनान्स आणि बिझनेसचे ज्ञान घेऊन तुम्ही मीडियामध्ये करिअर करू शकता. याशिवाय अर्थशास्त्राचे चांगले ज्ञान असल्यास तुम्ही प्रिंट, ऑनलाइन किंवा कंटेंट निर्मितीमध्ये करिअर करू शकता.
- बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (BMS) : जर तुम्हाला मॅनेजमेंट क्षेत्रात करिअर करायचे असेल तर बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (BMS) करणे तुमच्यासाठी चांगले राहील. यामध्ये व्यवस्थापन कौशल्य आणि नेतृत्व चांगले शिकवले जाते. एवढेच नाही तर मानव संसाधन, संशोधन पद्धती याविषयीही शिकवले जाते.
- प्रमाणित आर्थिक नियोजक : वैयक्तिक वित्त, संपत्ती व्यवस्थापन, विमा नियोजन यांसारखे अभ्यास करण्यासाठी तुम्ही प्रमाणित वित्तीय नियोजक करू शकता. याला (CFP) असेही म्हणतात आणि वित्त संबंधित संपूर्ण शिक्षण त्यात केले जाते. जर तुम्हाला या क्षेत्रात करिअर करायचे असेल तर तुम्ही बारावीनंतर सीएफपी करू शकता.
- कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट (CMA) : तुम्हाला मॅनेजमेंट अकाउंटिंग, कमर्शियल फंडामेंटल्स आणि इंडस्ट्रियल लॉ या विषयांचा अभ्यास करायचा असेल, तर तुम्ही कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट निवडू शकता. यामध्ये फायनान्स आणि मॅनेजमेंट हे दोन्ही विषय शिकवले जातात आणि कोर्स पूर्ण केल्यानंतर मॅनेजमेंट क्षेत्रात नोकरी मिळते.



## वाणिज्य क्षेत्रातील संधी

बारावीनंतर वित्त, विमा, बँकिंग, चार्टर्ड अकाउंटन्सी, परदेशी व्यापार, स्टॉक ब्रोकिंग अ‍ॅण्ड इव्हेन्स्टमेंट ॲनॅलिस्ट यांसारखे अभ्यासक्रम करता येतात. गेल्या काही वर्षांत बॅचलर इन अकाउंटन्सी अ‍ॅण्ड फायनान्स, बॅचलर इन बँकिंग अ‍ॅण्ड इन्शुरन्स, बॅचलर ऑफ फायनान्शियल मार्केट्स असे वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम काही संस्थांनी सुरू केले आहेत. बिझनेस इकॉनॉमिक्स, फायनान्स अ‍ॅण्ड कंट्रोल या विषयातही पदव्युत्तर पदवी प्राप्त करता येऊ शकते. वाणिज्य शाखेत पदव्युत्तर पदवी घेतलेल्या उमेदवारांना अध्यापन, नागरी सेवा, उच्च शिक्षण, बँकिंग क्षेत्र, ब्रोकिंग, संशोधन, विमा क्षेत्र, वित्तीय संस्था, कॉस्ट अकाउंटन्ट, कंपनी सेक्रेटरी, चार्टर्ड अकाउंटन्ट अशा काही संधी मिळू शकतात. बी.कॉम. आणि एमबीए अशा पदव्या प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील कंपन्या, कॉर्पोरेट्स या ठिकाणी उत्तम संधी मिळू शकते. जो उमेदवार संख्याशास्त्रावर प्रभुत्व मिळवतो त्यास वित्तीय अभियांत्रिकी (फायनान्शिअल इंजिनीअरिंग) या उच्च श्रेणीच्या व आव्हानात्मक कार्य क्षेत्रात काम करण्याची संधी मिळू शकते. भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या घटकांमध्ये बँक डिपॉझिट्स, म्युच्युअल फंड, स्टॉक मार्केट्स, व्हेंचर कॅपिटल, विमा, पोर्टफोलिओ मॅनेजमेंट यामध्ये सातत्याने नव्या बाबी घडत आहेत. त्याचाही लाभ वाणिज्य शाखेतील प्रशिक्षित उमेदवार घेऊ शकतात. जागतिकीकरणानंतर जगभरातील बँका आणि विमा कंपन्यांनी आपले जाळे सर्वत्र पसरवण्यास सुरुवात केल्याने या कंपन्यांना तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज भासते आहे. यामुळे वाणिज्य शाखेची पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना करिअर घडवण्याचे नवे पर्याय उपलब्ध झाले आहेत. एमबीए (फायनान्स) हा अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांना अधिक चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात. व्यावसायिक आणि व्यापारी उलाढालीचे उत्तम ज्ञान वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी मिळवले असल्याने त्यांना ई-कॉमर्स क्षेत्रातही चांगली कामगिरी करता येऊ शकते.



### संबंधित स्पेशलाइज्ड अभ्यासक्रम

- चार्टर्ड अकाउंटंट : द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया ही संस्था या विषयाशी निगडित अभ्यासक्रम चालवत असते. बारावी उत्तीर्ण कोणत्याही ज्ञानशाखेतील उमेदवार या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. संपर्क- www.icai.org
- कंपनी सेक्रेटरी : द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया या संस्थेने कंपनी सेक्रेटरीशिपचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम त्रिस्तरीय आहे. फाउंडेशन कोर्स कोणत्याही शाखेच्या बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांला करता येतो. आता या संस्थेने पदवीनंतरचा तीन वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुरू केला आहे. संपर्क- www.icsi.org
- कॉस्ट अ‍ॅण्ड वर्क अकाउंटंट (सीडब्ल्यूए) : इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अ‍ॅण्ड वर्क अकाउंटंट ऑफ इंडिया या क्षेत्रातील अभ्यासक्रम चालवते. तो फाउंडेशन, इंटरमिजिएट आणि फायनल असा त्रिस्तरीय आहे. फाउंडेशन अभ्यासक्रम बारावी उत्तीर्ण विद्यार्थी करू शकतात. इंटरमिजिएट अभ्यासक्रमास कोणत्याही विद्याशाखेतील पदवीधर थेट अर्ज करू शकतात. संपर्क- www.icwai.org
- चार्टर्ड फायनान्शिअल ॲनॅलिस्ट : पोर्टफोलिओ मॅनेजमेंट, इन्व्हेस्टमेंट कन्सल्टंट, इन्व्हेस्टमेंट बँकिंग, इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट, इंटरनॅशनल फायनान्स अ‍ॅण्ड रिसर्च या क्षेत्रांत करिअर घडवण्यासाठी संबंधित उमेदवार आपले कौशल्य वापरू शकतात. माहिती तंत्रज्ञानाचे कौशल्य अवगत केल्यास संधी आणखी वाढू शकते. चार्टर्ड फायनान्शिअल ॲनॅलिस्ट होण्यासाठी आयसीएफएआय (इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड फायनान्शिअल ॲनॅलिसिल ऑफ इंडिया) या संस्थेचा त्रिस्तरीय अभ्यासक्रम करावा लागतो. हा अभ्यासक्रम प्रत्यक्ष तसेच ऑनलाइन पद्धतीनेही करता येतो. संकेतस्थळ- www.icfai.org
- बँकिंग : वाणिज्य शाखेच्या पाश्र्वभूमीसोबत एमबीए, सीए, सीएफए (चार्टर्ड फायनान्शिअल अकाउंटंट) अशा पदव्या असल्यास या क्षेत्रात उच्च श्रेणीच्या संधी मिळू शकतात. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील बँकांनी आता गृह, शैक्षणिक, घरगुती वस्तू कर्ज, म्युच्युअल फंड, कॅपिटल मार्केट, विमा अशा क्षेत्रांत भूमिका विस्तारल्याने त्यांना तज्ज्ञ उमेदवारांची गरज मोठ्या प्रमाणावर भासू लागली आहे.
- गुंतवणूक : या क्षेत्रात रिसर्च ॲनॅलिस्ट, इन्व्हेस्टमेंट बँकर, म्युच्युअल फंड एक्झिक्युटिव्ह, कॅपिटल मार्केट मॅनेजर, फायनान्शिअल प्लॅनर, ॲसेट मॅनेजर, व्हेंचर कॅपिटॅलिस्ट आदी करिअर संधी मिळू शकतात.
- विमा क्षेत्र : भारतात हे क्षेत्र गतीने वाढत आहे. या क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर विशिष्ट कालावधीच्या अनुभवानंतर उमेदवारांना उत्तमोत्तम करिअर संधी उपलब्ध होऊ शकतात. ॲक्चुरिअल सोसायटी ऑफ इंडियामार्फत घेण्यात येणारी परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. विमा क्षेत्रात काम करण्यासाठी परवान्यासाठी गरज भासते.

### करिअर संधी

अकाउंटन्ट, फायनान्स कंट्रोलर, अकाउंटन्ट एक्झिक्युटिव्ह, चार्टर्ड अकाउंटन्ट, कंपनी सेक्रेटरी, फायनान्स ॲनॅलिस्ट, फायनान्स कंट्रोलर, फायनान्स मॅनेजर, फायनान्स कन्सल्टंट, इनव्हेस्टमेंट ॲनॅलिस्ट, स्टॉक ब्रोकर, पोर्टफोलिओ मॅनेजर, टॅक्स ऑडिटर, टॅक्स कन्सल्टंट, ऑडिटर, स्टॅटिस्टियन, इकॉनॉमिस्ट, क्रेडिट मॅनेजर, ज्युनिअर अकाउंटंट, बुक कीपर, इंटरनेट मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह- ईकॉमर्स, कॉर्पोरेट लॉयर.

## शॉर्ट न्यूज

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे स्मरण पत्र

**■ नगर :** शहरामध्ये व उपनगर परिसरात वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्या आदेशाने व शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या नेतृत्वाखाली विद्युत महावितरण कार्यालयात गॅस बत्ती व मेणबत्ती पेटून आंदोलन करण्यात आले होते. शहरामध्ये गेले कित्येक दिवसापासून शहर व उपनगरामध्ये नागरिकांना तथा आपल्या ग्राहकांना पूर्वकल्पना न देता वारंवार वीज खंडित केली जाते व नागरिकांना वेठीस धरण्याचे काम केले जात असून नागरिक हैराण झाले.

### निर्मलसरिता पुस्तकाचे प्रकाशन

**■ संगमनेर :** येथील सुलभा शिवाजीराव दिघे लिखित निर्मलसरिता या आत्मवृत्त कथनपर पुस्तकाचे प्रकाशन माजी महसूल मंत्री, आमदार बाळासाहेब थोरात व माजी. आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर शिवाजीराव दिघे, माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गा तांबे, कांचन थोरात, डॉ. जयश्री थोरात, वैशाली कुलकर्णी सहित मान्यवर उपस्थित होते. प्रसंगी आमदार थोरात यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### शेवगावात सरासरी ११५ मिलिमीटर पाऊस

**■ शेवगाव :** तालुक्यात यंदा मान्सूनच्या प्रारंभीच सरासरी ११५ मिलिमीटर पाऊस झाला आहे. मागील आठवड्यात जवळपास संपूर्ण तालुक्यात पावसाने हजेरी लावली. काही भागात चांगला तर काही भागात मध्यम स्वरूपाचा, लागवडी, पेरणी योग्य पाऊस झाला. त्यामुळे बाजरी, सोयाबीन पेरणी, तर कपाशी, तूर लागवडीस शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे. यंदा कृषी विभागाचे ६२ हजार ९९७ हेक्टर क्षेत्रावर खरिपाचे उद्दिष्ट आहे.

### शास्त्रज्ञांच्या पाठीवर कुलगुरुंची कौतुकाची थाप

**■ राहुरी :** कृषि विद्यापीठाने देशाच्या व राज्याच्या कृषि विकासात मोठे योगदान दिले आहे. ज्यावेळी आपण शेतकऱ्यांच्या शेतावर जातो, तेव्हा सर्वात जास्त समाधान, आनंद ते वाण तयार करणार्या शास्त्रज्ञाला होते. अशा स्वयंप्रेरीत शास्त्रज्ञांनी केलेल्या कामामुळेच विद्यापीठाचे नांव मोठे होते. असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांनी केले. ज्या शास्त्रज्ञांनी विविध पिके, भाजीपाला वाण, कृषि यंत्रे व ९२ तंत्रज्ञान शिफारशी तयार करण्यासाठी योगदान दिले. त्या शास्त्रज्ञांचा सत्कार कुलगुरु पाटील यांच्या हस्ते

### श्रीगोंदा-मांडवगण रस्ता दुरुस्तीचे काम निकृष्ठ

**■ श्रीगोंदा :** नगरपरिषद हद्दीलगत नव्याने दुरुस्त करण्यात आलेल्या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ठ पद्धतीने सुरू आहे. तसेच या रस्त्याच्या कामासाठी निकृष्ठ दर्जाचा मुरूम तसेच कालबाह्य मशिनरी वापरण्यात येत असल्याचे वारंवार सार्वजनिक बांधकाम प्रशासनाला कळविण्यात आले होते. वरीष्ठ पातळीवर तात्काळ चौकशी अहवाल तयार करुन संबंधित ठेकेदारास काळ्या यादीत समाविष्ट करावे, तसेच ईतर कामाची देखील पाहणी करुन स्थगीती देण्यात यावी.

# तुमचा जीव म्हणजे माझाच जीव समजून जपा

## ■ पंकजा मुंडे यांची भावनिक आवाहन ■ आत्महत्याग्रस्त तरूणांच्या कुटुंबाला दिला धीर

**बीड : प्रतिनिधी**

**भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी आज दुसर्या दिवशी डिघोळ अंबा आणि येस्तार येथे आत्महत्या केलेल्या तरूणांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले व धीर दिला. या तरूणांच्या परिवाराच्या मागे मी खंबीरपणे उभी राहील, त्यांचा आधार होईल, अशा शब्दांत त्यांनी परिवाराला धीर दिला. दरम्यान, स्वतःला संपवू नका, तुमचा जीव हा माझा जीव समजून त्याला जपा, या निराशेतून बाहेर या, असे आवाहन त्यांनी पुन्हा एकदा केले आहे.**



लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव जिव्हारी लागल्याने डिघोळ अंबा ता. अंबाजोगाई येथील पांडूरंग सोनवणे आणि येस्तार ता. अहमदपूर येथील सचिन कोंडिबा मुंडे या तरूणांनी स्वतः चे जीवन संपवले. पंकजा मुंडे यांनी आज या दोन्ही गावात जावून सोनवणे व मुंडे परिवाराचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला. पंकजा यांना पाहताच या दोन्ही कुटुंबातील सदस्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

**स्वतःला संपवू नका ; तुमचा जीव हा माझा जीव**

यावेळी माध्यमांशी बोलताना पंकजा मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या की, आत्महत्येचे हे सत्र बंद झाले पाहिजे. माझ्या स्वतःसाठी ही चांगली गोष्ट नाही. मी हिंमतीने लढणारी व्यक्ती आहे, मी कधी कोणत्या गोष्टीने डगमगले नाही. पण ह्या प्रकाराने प्रचंड डगमगले आहे. लोकांनी स्वतःचे प्राण देणे हे मला अपराधी वाटतय. माझी विनंती आहे, असे काही करू नका. ह्या कुंटूबाच्या मागे मी तर उभी राहणारच आहे, हा विषय सर्वांना सांगण्याचा नाही. पण आत्महत्या सारख्या गोष्टीचे मी समर्थन नाही करू शकत.

आपल्या परिवाराला, लहान लेकरांना, पत्नीला वाऱ्यावर सोडून असा निर्णय कुणी घेऊ नये. तुम्हाला मला काही द्यायचे असेल तर आपल्या कामातून, कष्टातून द्या. परंतू प्रत्येकाचा जीव जाणे मला तेवढंच दुःखदायक आहे. तुमचा जीव म्हणजे माझाच जीव आहे असे समजून जपा, एवढीच माझी विनंती आहे. तुम्हाला शपथ आहे माझी या निराशेतून बाहेर या असे आवाहन त्यांनी केले.

## (पान १ वरुन) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका होणे गरजेचे

करतात. विरोध करणारी व्यवस्था थांबली असल्याने ग्रामिण विकासाला गती देण्याची गरज आहे. आजची व्यवस्था फक्त प्रशासकावर अवलंबून आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होणे गरजेचे असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. केंद्रात खासदार असोत, आमदार असोत, जिल्हा परिषद सदस्य असोत सर्वांचा उद्देश गावांमधील योजना शेवटच्या घटकांपर्यत घेऊन जाण्यासाठी सर्वांचा प्रयत्न असतो. ही व्यवस्था सक्षम असणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेची निवणूक प्रक्रिया लोकशाही बळकट करणारी आहे. त्यासाठी त्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे पवार शेवटी म्हणाले.

## जुन्या पेन्शन योजनेचा तिढा मीच सोडविणार!

संपादन केल्यानंतर शासन दरबारी पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण पुढाकार घेणार आहोत.
विवेक कोल्हेअपक्ष आमदार, नाशिक शिक्षक मतदार संघ
विवेक यांची भूमिका मतदारांना भावली
जुन्या पेन्शन योजनेसाठी विवेक कोल्हे यांनी घेतलेल्या आक्रमक भुमीकेमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यां मध्ये हा विषय चर्चेचा तसेच जिव्हाळयाचा ठरला आहे. परखड भूमिका घेऊन न्याय देण्याची भूमिका घेणारे अपक्ष उमेदवार कोल्हे यांच्यासाठी मतदारसंघातील सर्व जिल्हयांमध्ये मोठे पाठबळ मिळत असल्याचे चित्र आहे.

**सर्वसमावेशक विवेकनामा**

जुन्या पेन्शन योजनेबरोबरच शिक्षकांच्या अनेक न्याय्य मागण्यांसाठी विवेक कोल्हे हे लढा देणार आहेत. सर्वच मागण्यांची तड लावण्याचा निर्धार कोल्हे यांनी त्यांच्या विवेकनाम्यात केला आहे. विना अनुदानित शाळांचे अनुदान, शिक्षकांची अशैक्षणिक कामे, तुकडयांना मान्यता, शिक्षकांचे निवृत्ती वय, महिला शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठीही आपण संघर्ष करणार असल्याची ग्वाही कोल्हे यांनी विवेकनाम्यात दिली असल्याने युवा विवेक कोल्हे यांचा विवेकनामा सर्वसमावेशक असल्याच्या प्रतिक्रिया शिक्षकांकडून देण्यात येत आहेत.

**अभ्यासू आणि धाडसी व्यक्तीमत्व**

अभ्यासू आणि धाडसी भूमिकेमुळे विवेक कोल्हे यांची संपूर्ण नाशिक शिक्षक मतदारसंघात ख्याती आहे. अन्याय झाल्यानंतर कितीही संघर्ष वाट्याला आला तरी ठामपणे उभे राहणे ही त्यांची खुबी महाराष्ट्राने अनुभवलेली आहे. घेतलेल्या भूमिकेवर ठाम राहणे हे त्यांचे वैशष्ट्य असल्याने त्यांना संपूर्ण मतदारसंघात प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

## खासदार सुनील तटकरे यांचा आजपासून राज्यव्यापी दौरा !

**सुरू होत आहे.**लोकसभा निवडणुकीची धामधूम संपताच प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी पक्षाच्या कार्यकारिणीची आणि आमदारांची बैठक घेत पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसला राज्यात भरघोस यश मिळवून देण्यासाठी राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा केली होती. रांजणगावच्या महागणपतीचे दर्शन घेऊन त्याची आज सुरुवात झाली. यावेळी रांजणगाव महागणपती देवस्थानच्या वतीने सुनिल तटकरे आणि रुपाली चाकणकर यांचा सत्कार करण्यात आला.लोकसभेला कमी खासदार आले असले तरी विधानसभेला अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीची ताकद वाढवण्यासाठी प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी कंबर कसली आहे. या राज्यव्यापी दौऱ्यातून पक्षाची दिशा आणि भूमिका प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे स्पष्ट करणार आहेत.

दोन दिवसीय दौऱ्यादरम्यान अहमदनगर शहर, अहमदनगर दक्षिण ग्रामीण, कोपरगाव, अकोले, श्रीरामपूर नेवासा या विधानसभा मतदारसंघाचा आढावा आपण घेणार आहोत, असे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी सांगितले.

यावेळी माजी आमदार पोपटराव गावडे, शिरूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष रवींद्र काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शिरूर- आंबेगावचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, शिरूर तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल वर्पे, शरद कालेवार यांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस भरतीसाठी बुधवारपासून मैदानी चाचणी सुरू

## अरणगाव ते वाळुंज रस्त्यावर राहणार एकेरी वाहतूक



**नगर : प्रतिनिधी**

**जिल्ह्याच्या पोलीस प्रशासनासाठी ६४ जागांची पोलीस भरती प्रक्रिया निघाली आहे. या भरती प्रक्रिये अंतर्गत बुधवार (ता. १९) ते २९ जून या कालवधीत नगरच्या पोलीस मुख्यालय व अरणगाव- वाळुंज बाह्यवळण रस्त्यावर मैदानी चाचणी होणार आहे, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी पत्रकार परिषदेतून दिली.**

जिल्ह्यातील ६४ जागांपैकी पोलीस शिपाई पदासाठी २५ तर वाहनचालक पदासाठी ३९ जागा आहेत. पोलीस शिपाई या पदासाठी एक हजार ९४७ तर चालक पदासाठी तीन हजार ९०९ उमेदवार असे पाच हजार ८५६ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. एकाच वेळी दोन जिल्ह्यांमध्ये परीक्षेचे अर्ज भरलेल्या उमेदवारांसाठी विनंती अर्ज करून मुदत वाढविण्याची सोयही उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी दोन्ही अर्ज हे वेगवेगळ्या पदांसाठी असणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

**पावसामुळे व्यत्यय आल्यास पुढील योग्य ती तारीख**

भरती प्रक्रियेच्या वेळी सर्वप्रथम उमेदवारांची प्राथमिक कागदपत्र पडताळणी, शारीरिक पात्रता व उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात येणार आहे. मैदानी चाचणी वेळी पावसामुळे व्यत्यय आल्यास अगर मैदानी चाचणी होऊ न शकल्यास उमेदवारांना पुढील योग्य ती तारीख देण्यात येईल. मैदानी चाचणीची पहिली तारीख व दुसरी तारीख यामध्ये किमान चार दिवसांचे अंतर ठेऊन पुढील तारीख देण्यात येणार आहे. मात्र, यासाठी उमेदवारांनी पहिल्या मैदानी चाचणीला हजर होता त्याचे लेखी पुरावा दुसऱ्या मैदानी चाचणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

या भरती प्रक्रियेत उमेदवारांना अरणगाव बाह्यवळण पासून वाळुंज बाह्यवळणपर्यंत १६०० मीटर अंतर धावावे लागणार आहे. त्यामुळे १९ ते २९ जून या कालावधीत दररोज सकाळी ६ ते दुपारी २ या कालावधीत अरणगाव ते वाळुंज बाह्यवळणकडे जाणाऱ्या रस्त्याच्या एका बाजूवरील सर्व प्रकारची वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. त्या ऐवजी सर्व वाहतूक त्याच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला म्हणजे वाळुंज बाह्यवळण पासून अरणगाव बाह्यवळण मार्गे ये-जा चालेल, असे जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी सांगितले आहे.










# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी दत्ता गाडगे यांची निवड

## प्रदेश पातळीवर घेतली कार्याची दखल



**पारनेर :प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या अहमदनगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी पारनेरचे दत्ता गाडगे यांची बिनविरोध निवड झाली. त्यांना निवडीचे पत्र महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश महासचिव डॉ. विश्वासराव अरोटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची अहमदनगर जिल्ह्याची बैठक रविवारी दि. १६ जून रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश महासचिव डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या अध्यक्षतेखाली शिर्डी येथे संपन्न झाली.यावेळी संघटनेच्या अहमदनगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी दत्ता गाडगे बिनविरोध निवड करण्यात आली.

अहमदनगर उत्तर जिल्हाध्यक्षपदी सोमनाथ काळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.यापूर्वी दत्ता गाडगे यांची जिल्हा सचिवपदी बिनविरोध निवड झाली होती.त्याचप्रमाणे पारनेर तालुकाध्यक्ष म्हणून ३ वेळा बिनविरोध राहिले आहेत. त्यांनी तालुकाध्यक्ष व जिल्हा सचिव म्हणून केलेल्या चांगल्या कामाबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने प्रदेश पातळीवर दखल घेतली.दत्ता गाडगे यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले.पत्रकार संघाचे माध्यमातुन वृक्षारोपण,गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान,पत्रकार सन्मान,माजी सैनिकांचा सन्मान आदीसह, पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर जिल्ह्यात वेळोवेळी आवाज उठविला आणि पत्रकारांना नेहमीच न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांच्या कार्यकाळात त्यांना मिळालेली पदे ही नेहमी बिनविरोध मिळाली आहेत. त्यांना पत्रकारीतेमधील अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.फळ म्हणून त्यांची जिल्हाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी जिल्हा निवड समिती अध्यक्षपदी फायकतअली सैय्यद यांची बिनविरोध निवड करण्यात आली.जिल्हासचिवपदी सुरेश खोसे तर, पारनेर तालुका अध्यक्षपदी संतोष तांबे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश महासचिव डॉ. विश्वासराव आरोटे यांनी काम पाहिले.सहाय्यक निवडणुक अधिकारी म्हणुन जिल्हा प्रसिध्दी प्रमुख भाऊसाहेब वाघचौरे यांनी काम पाहीले. दत्ता गाडगे यांच्या निवडीबद्दल अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, खासदार नीलेश लंके,खासदार अमोल कोल्हे,माजी आमदार विजयराव औटी,श्रीविघ्नहर सहकारी साखर कारखाना चेअरमन सत्यशिल शेरकर, सभापती काशिनाथ दातेसर, जि.प.चे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील,शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख डॉ.श्रीकांत पठारे आदींनी फोनद्वारे अभिनंदन केले आहे.

निवड प्रसंगी शिर्डी येथे पारनेर तालुक्यातील पत्रकार संतोष कोरडे, गंगाधर धावडे,वसंत रांधवन,सुधिर पठारे, ठकसेन गायखे,विशाल फटांगडे,संपत वैरागर,रामदास नरड,सचिन जाधव,प्रविण वराळ, चंद्रकांत कदम,नितीन परंडवाल,महेश शिंगोटे,दिपक वरखडे,सोमनाथ गोपाळे,सदानंद सोनावळे,संदिप गाडे,सुदाम दरेकर,राहुल फुंदे आदींसह जिल्ह्यातील पत्रकार बांधव मोठ्या सखेने उपस्थित होते.

# सामाजिक कामाचे फळ लोकसभा निवडणूकीत मिळाले

## ■ खा.नीलेश लंके यांचे प्रतिपादन ■ राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने खा.लंके यांचा सत्कार

**निघोज : प्रतिनिधी**

**राजकारण करताना आपण समाजकारणाला अधिक महत्त्व दिले त्याचे फळ लोकसभा निवडणूकीत मिळाल्याचे सांगत पुढील काळातही सत्तेचा वापर समाजासाठी करणार असल्याचे प्रतिपादन खा. नीलेश लंके यांनी केले.**

खासदार लंके यांचा राज्य मराठी पत्रकार संघ पारनेर तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे, कार्याध्यक्ष शिरीष शेलार, जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड, तालुका उपाध्यक्ष राम तांबे, श्रीनिवास शिंदे, ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर, पारनेरचे शहराध्यक्ष संतोष सोबले, खजिनदार अविनाश भांबरे , संजय मोरे,निघोज शहराध्यक्ष आनंद भुकन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक ज्ञानेश्वर लोंढे, प्रवक्ते जयसिंग हरेल, संदीप ईधाटे आदी पत्रकार पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना खा.लंके म्हणाले ,गेली पावणेपाच वर्षात आपण पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली तसेच सामाजिक कामांच्या माध्यमातून राज्यात काम केले याचे फलीत आपल्याला लोकसभा निवडणुकीत मिळाले म्हणून जनतेने आपल्यावर विश्वास व्यक्त करुन निवडून दिले आहे. खासदारकीच्या माध्यमातून जिल्ह्यातील तसेच राज्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

राज्य मराठी पत्रकार संघाचे पारनेर तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे यांनी सांगितले की खासदार लंके यांचे राज्याचे प्रदेशाध्यक्ष संजय भोकरे, राज्याचे सचिव विश्वास आरोटे, जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय पाचपुते यांनी अभिनंदन केले आहे. विकासकामांचे पुरस्कर्ते म्हणून खासदार लंके यांचे मोठे काम असून तालुक्यातील पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी गेली दहा वर्षात मोठ्या प्रमाणात योगदान दिले असून पत्रकार संरक्षण कायदा, पत्रकारांना वयाच्या ६० व्या वर्षांनंतर केंद्र सरकारची सेवानिवृत्त मानधन यासाठी ते लोकसभेत आवाज उठवून देशातील आणि विशेष करुन राज्यातील पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते पुढाकार घेतील असा विश्वास वाघमारे यांनी व्यक्त केला.

राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय भोकरे, राज्याचे सचिव विश्वास आरोटे व जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाचपुते यांच्या हस्ते व जिल्ह्यातील पत्रकारांच्या प्रमुख उपस्थितीत खासदार लंके यांचा लवकरच सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती वाघमारे व जिल्ह्याचे उपाध्यक्ष विनोद गायकवाड यांनी दिली.



■ खासदार नीलेश लंके यांचा राज्य मराठी पत्रकार संघाचे पारनेरचे तालुकाध्यक्ष बाबाजी वाघमारे जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड, ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान होणार

**राज्य मराठी पत्रकार संघाची पारनेर तालुका शाखेची बैठक पारनेर येथे होऊन यामध्ये तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड, तालुका उपाध्यक्ष राम तांबे व श्रीनिवास शिंदे यांनी तालुका कार्यकारिणी जाहीर केली आहे. राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय भोकरे व महासचिव विश्वास आरोटे, जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय पाचपुते यांनी या कार्यकारीणीला मान्यता दिली आहे. रविवार दि.२३ रोजी या नूतन सदस्यांना व पदाधिकारी यांना रितसर प्रदेशाध्यक्ष संजय भोकरे, महासचिव विश्वास आरोटे व जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय पाचपुते यांच्या हस्ते पत्र देण्यात येणार आहेत तसेच ओळखपत्र देण्यात येऊन सन्मान करण्यात येणार आहे तसेच तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर यांनी दिली आहे.**

# अनाथ मुलांना भेटवस्तू देऊन केला बाळाचा वाढदिवस

**शिरूर : प्रतिनिधी**

**करंदी, ता. पारनेर येथील युवा कवी सोमनाथ चौधरी यांनी शिरुर येथील मनशांती छात्रालयातील अनाथ मुलांना भेटवस्तू व खाऊ देऊन आपल्या बाळाचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला.**

पारनेर साहित्य साधना मंचच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कवी चौधरी यांनी छात्रालयातील अनाथ मुलांना जीवनोपयोगी भेटवस्तू देऊन आणि कवी संमेलनाचा कार्यक्रम सादर करून स्वराज याचा दुसरा वाढदिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला. पद्मश्री सिंधुताई सपकाळ तथा माई यांनी स्थापन केलेल्या शिरुर येथील मनशांती छात्रालय येथे हा कार्यक्रम पार पडला. छात्रालयातील मुलांसमोर रंगलेल्या कवी संमेलनात गझलकार संजय पठाडे, डॉ. प्रवीण जाधव, संदीप राठोड, अशोक गायकवाड व सोमनाथ चौधरी यांनी एकाहून एक सरस कविता सादर केल्या. मुलांनी कवी संमेलनास उत्स्फूर्त दाद दिली.



### मनशांती छात्रालयात रंगले कवीसंमेलन

कवी संमेलनानंतर छात्रालयातील अनाथ मुलांनी स्वराजचा वाढदिवस साजरा केला.

त्यानंतर सोमनाथ चौधरी परिवारातर्फे छात्रालयातील अनाथ मुलांना जीवनोपयोगी विविध वस्तुंचे वाटप करण्यात आले. तसेच खाऊ देण्यात आला. छात्रालयाचे प्रकल्प व्यवस्थापक सचिन ढोरमले, अधीक्षक मिनाक्षी लटांबळे, केअर टेकर भाऊसाहेब मांदळे, अक्षय खरमाळे यांनी कवींचे स्वागत केले. यावेळी अनेक नागरिकही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# सरपंच शिवाजी निमसे यांना आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर

## आ.रोहित पवार यांच्या हस्ते १ जुलैला वितरण

**कासारे : प्रतिनिधी**



**कासारे गावचे उपक्रमशील सरपंच शिवाजी निमसे यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या कामाची दखल घेऊन सरपंच सेवा संघाच्या वतीने दिला जाणारा आदर्श सरपंच पुरस्कार कासारे गावचे सरपंच शिवाजी निमसे यांना जाहीर झाला आहे. नुकतीच या पुरस्काराची घोषणा सरपंच संघटित चळवळीचे नेते व सरपंच सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब पावसे यांनी केली आहे.**

येत्या १ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता माऊली संकुल सभागृह अहमदनगर या ठिकाणी आमदार रोहित पवार यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. सरपंच शिवाजी निमसे यांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून व मित्र परिवाराकडून अभिनंदन होत आहे. कासारे गावच्या सरपंचपदी निवड झाल्यानंतर शिवाजी निमसे यांनी अनेक विकासाची कामे मार्गी लावली आहेत. कासारे गावचा कायापालट त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केला आहे.

पाणी आडवा पाणी जिरवा यासंदर्भात त्यांनी मोठे काम केले आहे. वृक्ष लागवड करून त्यांनी हरित कासारे निर्माण केले आहे. कृषी क्षेत्रातही त्यांनी मोठे काम केले आहे. शेतकरी गट स्थापन करून त्यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे शासकीय योजना शेतकऱ्यांपर्यंत व सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवणे यासाठी प्रामुख्याने सरपंच निमसे हे काम करत आहेत. त्यांच्या या कामाची दखल सरपंच सेवा संघाच्या वतीने घेण्यात आली आहे त्यामुळे त्यांना हा आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# म्हस्केवाडी शाळेत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

## मोफत पाठयपुस्तकांचे वाटप

(छाया - शरद रसाळ, सुपा)



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हस्केवाडी येथे शाळा इ.१ ली. शाळा प्रवेशोत्सव २०२४ आणि मोफत पाठयपुस्तक वाटप हा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश गोरडे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गगे , सरपंच डॉ. किरण पानमंद, जेष्ठ सेवानिवृत्त शिक्षक मनाजी म्हस्के गुरुजी व सदस्य विद्यार्थ्यांचे पालक तसेच शिक्षक उपस्थित होते.**

या प्रसंगी इयत्ता १ लीत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन नवागतांचे स्वागत करण्यात आले. तसेच शाळेतील सर्व मुलांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देण्यात आले. यावेळी शिक्षक, पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोनभाऊ गावडे यांचे कार्य प्रेरणादायी

## नवनाथ महाराज माशेरे यांचे प्रतिपादन

**निघोज : प्रतिनिधी**

**माजी जिल्हा परिषद सदस्य प्रा सोनभाऊ गावडे यांचे कार्य प्रेरणादायी होते असे प्रतिपादन ह भ प नवनाथ महाराज माशेरे यांनी केले.**

टाकळी हाजी ता शिरूर येथे बापुसाहेब गावडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रा सोनभाऊ गावडे यांच्या १२ व्या पुण्यातिथी निमित्ताने १० वी १२ वी परीक्षेतील यशस्वी विद्यार्थाचा सत्कार व स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते . या वेळी ह भ प नवनाथ महाराज माशेरे यांच्यासह माजी आमदार पोपटराव गावडे,माजी सभापती सुनिता गावडे, बाजार समितीचे माजी संचालक राजेंद्र गावडे, घोडगंगाचे संचालक सोपान भाकरे, माजी नगराध्यक्षा मनिषा गावडे,चांदाशेठ गावडे, प्रभाकर खोमणे,सखाराम खामकर, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, शिरूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय बारहाते, धोंडीभाऊ जाधव,खंडु जाधव, पोपट हिलाल, पोपट वाळुज, सुभाष गावडे, शिवाजी कांदळकर, शांताराम उचाळे , बाबाजी रासकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




या वेळी हभप नवनाथ महाराज माशेरे म्हणाले की, सोनभाऊ गावडे यांनी अनेक तरुण वर्गाला मार्गदर्शन करीत आदर्श नागरीक घडविले .शिक्षणामधे परिस्थिती बदलण्याचे सामर्थ्य आहे . प्रत्येक पालकांनी शिक्षणाकडे प्राधान्याने लक्ष देऊन पालकाला दर्जेदार व संस्कारक्षम शिक्षण दिले पाहिजे .
या वेळी माजी आमदार पोपटराव गावडे म्हणाले की, या भागाच्या विकासासाठी जिल्हा परिषद सदस्य सोनवणे यांचे योगदान मोठे आहे .या भागामध्ये वाडी वस्तीवर जिल्हा परिषद शाळा सुरू करण्यासाठी व त्या शाळेला इमारती बांधण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.या वेळी प्राचार्य आर.बी. गावडे यांनी प्रस्ताविकात सोनुभाऊ गावडे यांनी या परिसराच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डी.एम. निचित तर आभार दौलत सोनवणे यांनी मानले.

# भक्ती सिनेमामध्ये ‘अन्वी’दिसणार मुख्य भूमिकेत

## अभिनयातील गुणांवर झाली निवड

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा गावातील पवारवाडी चे महेश पवार हे सध्या नोकरीमुळे आणि मुलांच्या शिक्षणामुळे शिरूर येथे राहत आहेत. ज्ञानगंगा विश्वविद्यालयात त्यांची कन्या तिसरीत शिकत आहे. तिने शिरूर मध्ये १४ वर्षापासून सुरु असलेल्या “ नटराज कोहिनुर ड्रीम्स अकॅडमी ऑफ फिल्म इन्स्टिटयूट“ या इन्स्टिटयूट मध्ये ॲक्टिंग आणि डान्स या विषयाचा कोर्स जॉईन केला आहे. कोर्स सुरू असताना तिच्या अभिनयातील गुण पाहता आणि याच इन्स्टिटयूटच्या अश्वयुग फिल्म प्रॉडक्शनचा संध्या भक्ती नावाच्या वेबसिनेमाचे चित्रीकरण सुरु होत असल्याने त्या वेब सिनेमांमध्ये अन्वीची मुख्य भूमिकासाठी निवड झाली आहे.**



संध्या आणि अन्वीचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदन केले जात आहे. वेबसिनेमाचे दिग्दर्शन भाऊसाहेब इरोळे यांचे असून भाऊसाहेबांचा “ निळावंती एक रहस्य “ हा मराठी चित्रपट ऑक्टोबरमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. या आधीही इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांना इन्स्टिट्यूटचे संचालक दिग्दर्शक भाऊसाहेब इरोळे यांनी अनेक अल्बम साँग , चित्रपट , वेबसिरीज , सिरीयल , शॉर्ट फिल्म इ मुख्य भूमीकेसह काम करण्याच्या संधी दिल्या आहेत.

भक्ती या वेबसिनेमात १ गाणे असून त्या गाण्याचे रेकॉर्डिंग आज पूर्ण झाले आहे. पारनेर , शिरूर सह पांडुरंगाच्या वारीमध्ये याचे चित्रीकरण लवकरच पूर्ण होऊन हा सिनेमा आपल्याला जुलै अखेर पाहायला मिळणार आहे.

# शालेय जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो - सरपंच प्रकाश राठोड

## पळशी येथे पहिली व पाचवीच्या वर्गातील नवोगत विद्यार्थ्यांचे स्वागत

**पळशी : प्रतिनिधी**

**शिक्षण क्षेत्रामध्ये मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्राथमिक व माध्यमिक शालेय जीवनातच प्रयत्न हे होत असतात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न झाला पाहिजे असे मत पळशी गावचे लोकनियुक्त सरपंच प्रकाश राठोड यांनी व्यक्त केली.**

पळशी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पहिलीच्या व श्री मलवीर विद्यालय या ठिकाणी पाचवीच्या वर्गातील नवोगत विद्यार्थ्यांचे स्वागत सरपंच प्रकाश राठोड व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे खाऊचे वाटप करण्यात आले.



यावेळी सरपंच राठोड पुढे बोलताना म्हणाले ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकला पाहिजे त्याला शैक्षणिक सर्व सुविधा मिळाल्या पाहिजे ही प्रामाणिक भावना ठेवून आम्ही काम करत आहे. खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून पळशी सारख्या ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था आधुनिक करण्याचा आमचा प्रयत्न आहे. सर्व विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करत ऑनलाईन शिक्षण मिळाले पाहिजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण समतोल विकास साधण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

पळशी येथील शाळांमधील विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपसरपंच नवनाथ आगविले, दीपक कुटे, नितीन पाडळे, संपत जाधव, नितीन जाधव, अविनाश कणसे, किशोर गागरे, प्रताप खिलारी सर, मीना वाघ मॅडम, सुजाता डहाळे मॅडम, सीमा रोहकले व पळशी येथील ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com